जागतिक बँक अर्थसहाय्यीत

# महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प

सहकार व पणन विभाग, महाराष्ट्र शासन

प्रकल्प समन्वय कार्यालय

प्लॅट नं. एफ/ई/७८, पहिला मजला, भु -विकास बँकेचे प्रशिक्षण केंद्र, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११०३७

दूरध्वनी ०२०-२४२७०३१५/१६, फॅक्स ०२०-२४२७०३२२, ई-मेल- macp2009@ymail.com

जा.क्रं. एम.ए.सी.पी/पीसीयु/परिपत्रक/६७८ /२०११ दि. १९/७/२०११

## परिपत्रक

**विषय:- महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प (MACP) अंतर्गत पर्यावरणविषयक व सामाजिक व्यवस्थापन कार्यवाहीबाबत सविस्तर सुचना :-**

१) महाराष्ट्र शासन जागतिक बँकेच्या अर्थसहाय्यातून महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प (MACP) राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये हाती घेत आहे. प्रकल्पाशी संबधित माहिती **www.msamb.com** या संकेत स्तळावर उपलब्ध आहे.

२) प्रकल्पामध्ये शेतक-यांनी मागणीवर आधारित उत्पादन घ्यावे व त्यांच्या उत्पादनास बाजारपेठ उपलब्ध करून देणेसाठी विविध योजना व उपक्रम राबविले जाणार आहेत.

३) प्रकल्पांतर्गत एकात्मिक पर्यावरणविषयक व सामाजिक मुल्यांकन अभ्यास करण्यात आला. या अभ्यास अहवालात विविध योजना व उपक्रम राबविताना पर्यावरणाची हानी होणार नाही यास प्राधान्य देण्यात आले आहे त्याचप्रमाणे समाजातील महिला, आदिवासी व अन्य दुर्बल घटकांचा सहभाग घेण्यासंबंधी सूचना केलेल्या आहेत. या सुचनांचे पालन प्रकल्प राबविताना करणे आवश्यक आहे.

४) प्रकल्प अंमलबंजावणी कृषी पणन, कृषी व पशुसंवर्धन या तीन शासकिय विभागांमार्फत केली जाणार असून पर्यावरण विषयक व सामाजिक व्यवस्थापनाची जबाबदारी प्रत्येक विभागाच्या एका अधिका-याकडे दिली जाणार आहे.

**५) पर्यावरण विषयक व सामाजिक व्यवस्थापन:-**

**५.१ पर्यावरण विषयक :-**

i) प्रकल्पांतर्गत प्रस्तावित असलेल्या सुधारणा केल्यानंतर बाजारपेठेत शेतमालाच्या खरेदी विक्रीच्या प्रमाणात मोठी वाढ अपेक्षित आहे. या शेतमालातून निर्माण होणा-या कच-याच्या प्रमाणात (घन/ जैविक) देखील वाढ होईल. त्यामुळे या बाजारपेठांचे संपूर्ण प्रकल्प प्रस्ताव (FPP) तयार करण्याचे वेळी या कच-याच्या व्यवस्थापनासंबंधी (solid waste management) तरतूद करणे गरजेचे आहे. जैविक कचरा व्यवस्थापनासाठी गांढूळखत निर्मितीची (Vermi Compost Unit) तरतूद करून त्याच्या व्यवस्थापनाची जबाबदारी शक्य असेल तेथे स्थानिक महिला बचत गटांना दिल्यास त्यांची क्षमता बांधणीच्या दृष्टीने मदतच होईल. या शिवाय बाजारसमितीस अधिकचा महसूल देखील प्राप्त होईल.

ii) बांधकामाचे प्रस्ताव तयार करताना पर्यावरणावर कुठल्याही प्रकारे दुष्परिणाम होणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. त्याकरिता बांधकामासाठी शक्यतो पर्यावरणपूरक अशा साधनांचा

वापर करावा जसे; फ्लाय ॲश कॅांक्रीट, फ्लाय ॲश विटा, पाण्याचा दुरूपयोग टाळणे, कॅांक्रीट मिक्सर इ. धुतल्यानंतर त्या पाण्याचा पुर्नवापर करणे. नवीन इमारतींचे बांधकामाच्या प्रस्तावात पावसाचे पाणी संकलनाची (Roof rain water harvesting) तरतूद करणे गरजेचे आहे.

iii) प्रस्ताव तयार करताना वाढीव पाण्याच्या गरजेचे व त्यातून निर्माण होणा-या सांडपाण्याचे व्यवस्थापनासंबंधी तरतूद करणे आवश्यक आहे. शक्य असल्यास सांडपाण्यावर प्राथमिक प्रक्रिया करून शेती इ. करिता पुर्नवापर करावा.

iv) प्रगत बाजारपेठेमुळे शेतमालाची विक्री वाढेल व त्यामुळे शेतातील उत्पादन वाढविण्याकरिता शेतकरी मोठ्या प्रमाणात रासायनिक खतांचा व किटकनाशकांचा वापर करतील. यामुळे शेतजमिनी व पिकांवर होणारे संभाव्य दुष्परिणाम टाळण्यासाठी या प्रकल्पामध्ये पर्यावरणपूरक संवर्धन, मृदासंवर्धन, सुक्ष्म अन्नद्रव्य व्यवस्थापन, उपद्रवी किडींचा नाश या करिता संयुक्त आराखडा तयार करण्यात आलेला आहे. या अंतर्गत लाभार्थ्यांकरिता जाणीव जागृती, प्रशिक्षण इ. कार्यक्रम राबविण्यात येतील.

**५.२ सामाजिक :-**

i) प्रकल्प राबविताना लोकांचे / व्यावसायिकांचे विस्थापन होणार नाही याची काळजी घ्यावी.

ii) पुरूषांच्या बरोबरीने महिलांचा विकास व्हावा या दृष्टीने प्रकल्प अंमलबजावणीमध्ये व प्रकल्पातील उपक्रमातून महिलांचा सहभाग घेण्यात यावा.

iii) राज्यातील ज्या जिल्ह्यांमध्ये आदिवासी आहेत तेथील प्रकल्प उपक्रमांमध्ये आदिवासींचा सहभाग घेण्यात यावा. तसेच अन्य घटकांचे बरोबरीने त्यांना प्रकल्पातील लाभ मिळेल याची काळजी घेणेत यावी.

iv) प्रकल्पाचे यशस्वी अंमलबजावणीसाठी संबंधित कर्मचारी, लाभार्थी इ. साठी प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा , अभ्यासदौरे इ. कार्यक्रम हाती घेण्यात यावेत.

६) प्रकल्प समन्वय कक्ष, पुणे येथे पर्यावरण विषयक व सामाजिक विकास विभाग कार्यरत असुन या विषयांसदर्भात अधिक माहितीसाठी या विभागाशी संपर्क साधावा.

**प्रकल्प संचालक**
**महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प**